# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत )

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/म.व्य.(भूमी)/D 86642 दिनांक : 27/11/2019

## परिपत्रक

**विषय : - औद्योगिक क्षेत्रातील मेगा प्रोजेक्ट अंतर्गत ॲटोमोबाईल उद्योगाकरीता वाटप केलेल्या भूखंडांमधून १० टक्के पर्यन्तचे क्षेत्र पोटभाडयाने देणे...**

**संदर्भ :- १.मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/D२३५४९/२०१४ दिनांक १७.११.२०१४**

महामंडळाच्या दिनांक १७.११.२०१४ च्या परिपत्रकानुसार भूखंडावर Automobile body Building / Spare Parts या मूळ उदयोगाशी निगडीत Garage, Workshop / Showroom या पूरक उदयोगाकरीता भूखंडाच्या एकूण बांधीव क्षेत्राच्या १०% पर्यतचे क्षेत्र महामंडळाच्या पोटभाडे मार्गदर्शक परिपत्रकानुसार त्या त्या वर्षाच्या प्रचलित व्यापारी दराच्या ३% प्रति चौ.मी. प्रति वर्ष याप्रमाणे प्रत्यक्ष भाडयाने दिलेल्या क्षेत्रफळावर आकारण्यात यावे असे धोरण आहे. तथापि उदयोजकांकडून अशाप्रकारे वाटप केलेल्या भूखंडावर Automobile body building / Spare parts या मूळ उद्योगाशी निगडीत सर्व प्रयोजनाकरीता उदा.वित्त पुरवठा करणा-या संस्था तसेच Automobile क्षेत्राशी निगडीत इतर व्यवसाय यांकरीता क्षेत्र पोटभाडयाने देणेबाबत वारंवार मागणी होत असल्याने याबाबतचा विषय संचालक मंडळाच्या दिनांक ०९.०९.२०१९ रोजी झालेल्या ३८४ व्या बैठकीत सादर करण्यात येवून चर्चेअंती ठराव क्र. ५९९६ पारीत करण्यात आला. सदरहू पारीत ठरावानुसार महामंडळाच्या दिनांक १७.११.२०१४ रोजीच्या परिपत्रकातील अ.क्र. २ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

२. मेगा प्रोजेक्ट अंतर्गत ॲटोमोबाईल क्षेत्राकरीता वाटप केलेल्या भूखंडावरती Automobile body building / Spare parts या मूळ उदयोगाशी निगडीत सर्व प्रयोजनाकरीता उदा. वित्त पुरवठा करणा-या संस्था तसेच Automobile क्षेत्राशी निगडीत इतर व्यवसायाकरीता भूखंडाच्या एकूण बांधीव क्षेत्राच्या १० टक्के पर्यन्तचे क्षेत्र महामंडळाच्या पोटभाडे मार्गदर्शक परिपत्रकानुसार

त्या-त्या वर्षाच्या प्रचलित व्यापारी दराच्या ३% प्रति चौ.मी. प्रति वर्षी याप्रमाणे प्रत्यक्ष भाडयाने दिलेल्या क्षेत्रफळावर आकारण्यात यावे.

२. दिनांक १७.११.२०१४ च्या परिपत्रकातील उर्वरित अन्य तरतूदींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सदरहू धोरण या परिपत्रकाचे दिनांकापासून लागू राहिल. सर्व संबंधितांनी सदर सुधारित धोरणाची नोंद घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अविनाश सुभेदार)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई